क्र.सीईआर-२०१७/प्र.क्र.१०२/३०
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १ ऑगस्ट, २०१७.

प्रति,

पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.

**विषय: स्वातंत्र्य दिनाचा ७० वा वर्धापन दिन समारंभ.**
**दिनांक १५ ऑगस्ट, २०१७.**

स्वातंत्र्य दिनाचा ७० वा वर्धापनदिन मंगळवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०१७ रोजी राज्यात विभागीय मुख्यालये, जिल्हा मुख्यालये, उप विभागीय मुख्यालये, तालुका मुख्यालय येथे ध्वजारोहण करुन साजरा करण्यात येईल. त्यास अनुसरुन विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, कोंकण यांनी आपापल्या विभागातील विभागीय तसेच जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी ध्वजारोहण समारंभ आयोजित करण्याची योग्य ती व्यवस्था करावी. राज्याचा मुख्य शासकीय कार्यक्रम मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते मंत्रालय, मुंबई येथे ध्वजारोहण करुन साजरा करण्यात येईल. त्याचप्रमाणे पुणे येथे मा.राज्यपाल महोदयांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. तसेच कोंकण विभागीय मुख्यालय वाशी, नवी मुंबई येथे श्रीमती विद्या ठाकूर, मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषधी प्रशासन यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. कोल्हापूर येथे श्री. सदाशिव खोत, मा. राज्यमंत्री, कृषी व फलोत्पादन, पणन आणि पाणीपुरवठा व स्वच्छता व वर्धा या मुख्यालयी श्री. महादेव जानकर, मा.मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास हे ध्वजारोहण करतील. तसेच उर्वरित विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री ध्वजारोहण करतील. ध्वजारोहण करणारे मंत्री व राज्यमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम स्थळी वेळेवर पोहचू शकणार नसल्यास विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी ध्वजारोहण करुन ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी. संबंधित प्रांत अधिकारी व तहसिलदार हे अनुक्रमे उपविभागीय मुख्यालय व तालुका मुख्यालय येथे ध्वजारोहण करतील.

२. दिनांक १५ ऑगस्ट, २०१७ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी म्हणजे **सकाळी ९.०५ वाजता** आयोजित करण्यात यावा. जास्तीत जास्त लोकांना मुख्य शासकीय समारंभात सहभागी होता यावे यासाठी सदर दिवशी सकाळी ८.३५ ते ९.३५ वा. च्या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयाला अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो सकाळी ८.३५ वा. च्या पूर्वी किंवा ९.३५ वा. च्या नंतर आयोजित करावा.

३. राष्ट्रध्वजाला वंदन करताना जन-गण-मन हे राष्ट्रगीत वाजविण्यात यावे. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बँड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजवावा.

४. दिनांक १५ ऑगस्ट, २०१७ रोजी महाराष्ट्र राज्यात सर्व सार्वजनिक व शासकीय इमारतीवर (खेड्यांमध्ये सुद्धा) तसेच ऐतिहासिक महत्त्वाच्या किल्ल्यांवर (उदा. रायगड, सिंहगड, शिवनेरी, पुरंदर, वसई, प्रतापगड, दौलताबाद, सिताबर्डी) राष्ट्रध्वज उभारण्यात यावा.

५. राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक : एफएलजी-१०९१/३०, दिनांक २० मार्च, १९९१ व क्रमांक एफएलजी - १०९१/(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ आणि परिपत्रक क्रमांक : एफएलजी १०९८/३४३/३०, दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. ध्वजारोहणाची रंगीत तालीम घेतली जाईल याचीही दक्षता घ्यावी. राष्ट्रध्वज चांगल्या स्थितीत असल्याची व सुर्यास्तास उतरवला जाईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

(कृपया मागे पहावे)

६. खासदार, आमदार, जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, स्वातंत्र्य सैनिक, स्थानिक राजकीय पक्षांचे प्रमुख, दलित मित्र पुरस्कार प्राप्त व्यक्ती, स्थानिक शासकीय अधिकारी आणि प्रमुख नागरिक यांना मुख्य शासकीय कार्यक्रमास निमंत्रित करावे.

७. सामुदायिक राष्ट्रगीत गायनांचा अंतर्भाव असलेले खास कार्यक्रम शाळा व महाविद्यालयात आयोजित करण्यात यावेत.

८. विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती हे त्यांच्या मुख्यालयात ध्वजारोहण समारंभाची व्यवस्था करणार असल्यामुळे तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी वेगळे कार्यक्रम करण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे मुंबईतील कार्यक्रमासाठी विभागीय आयुक्त, कोंकण विभाग व जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. मुंबई उपनगर जिल्हा येथे जिल्हाधिकारी ध्वजारोहणाची सर्व तयारी करतील. विभागीय आयुक्त, कोंकण हे कोंकण भवन येथील समारंभाची व्यवस्था करतील.

९. ध्वजारोहण समारंभाला सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहण्याबाबत व उपस्थित राहणाऱ्या सर्व व्यक्तींना समारंभाचे वेळी राष्ट्रीय पोषाख परिधान करण्याबाबत आदेश मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांना द्यावेत.

१०. संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपापल्या अधिकारक्षेत्रात स्वातंत्र्य दिन समारंभ साजरा करण्यासंबंधी आवश्यक ती कार्यवाही कृपया करावी. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी या परिपत्रकात दिलेले अनुदेश योग्य प्रकारे पाळण्यात येतील, याची व्यक्तीश: दक्षता यावी.

**( नागनाथ भोगे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

- मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
- सर्व अपर मुख्य सचिव, मंत्रालयीन विभाग
- सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
- राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई / पुणे. (२ प्रतीं)
- मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव
- प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती) (पत्राने)
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
- प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
- प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने)
- प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने)
- प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई (पत्राने)
- जनरल ऑफिसर कमांडिंग, महाराष्ट्र व गुजरात विभाग, कुलाबा, मुंबई.
- फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ, वेस्टर्न नेव्हल कमांड, शहीद भगतसिंग रोड, मुंबई.
- एअर ऑफिसर कमांडिंग, हेडक्वार्टर्स, मेरीटाईम एअर ऑपरेशन्स, आयएएफ, बिल्डींग, धोबी तलाव, मुंबई-४०० ०२०
- स्टेशन कमांडर, इंडियन एअर फोर्स स्टेशन, मुंबई,

- सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
- केंद्र संचालक, दूरदर्शन, वरळी, मुंबई-४०० ०१८.
- केंद्र संचालक, आकाशवाणी मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद.
- पोलीस आयुक्त मुंबई / पुणे / नागपूर / ठाणे / नाशिक / औरंगाबाद / सोलापूर / नवी मुंबई.
- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई-४००००१.
- सर्व महानगरपालिका आयुक्त.
- सर्व पोलीस उप महानिरिक्षक.
- महासमादेशक, नागरी संरक्षण दल, मुंबई.
- सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
- सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.
- महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई (पत्राने)
- महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर (पत्राने)
- अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
- निवासी लेखा अधिकारी, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई.
- महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
- संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय, मुंबई.
- संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, मुंबई.
- सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
- वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
- शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
- सभापती / उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव
- अध्यक्ष / उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
- विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव
- मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, मुंबई
- सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- संचालक, क्रिडा व युवक सेवा, सेंट्रल बिल्डींग, पुणे
- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग-१, मुंबई,
- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-२, मुंबई
- कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, वरळी, मुंबई.
- कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.वि., वरळी, मुंबई
- संचालक, उपवने व उद्याने, बांधकाम भवन, मुंबई.
- निवडनस्ती (कार्यासन-३०)

*************************